# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. ३०/११/२०१६
## (दि. २८/१०/२०१६ रोजीची तहकुब सभा)

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक २८/१०/२०१६ रोजी सभा सुचना क्र. ०८ दि. २४/१०/२०१६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबित विषय क्र. ७३ ते ८६ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा बुधवार दि. ३०/११/२०१६ रोजी सकाळी ११.०० वा. मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. हरिश्चंद्र आंमगावकर हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

<u>उपस्थित सदस्य</u>

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | मा. सभापती |
| २. | श्री. शरद केशव पाटील | सदस्य |
| ३. | श्री. प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ४. | श्री. वेंचर गिल्बर्ट मेन्डोसा | सदस्य |
| ५. | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ६. | श्रीम. डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ७. | श्रीम. बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ८. | श्री. राकेश रतिशचंद्र शहा | सदस्य |
| ९. | श्री. यशवंत ठकाजी कांगणे | सदस्य |
| १०. | श्रीम. वर्षा गिरीधर भानुशाली | सदस्या |
| ११. | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| १२. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्य |
| १३. | श्री. राजू यशवंत भोईर | सदस्य |
| १४. | श्रीम. झिन्नत रऊफ कुरेशी | सदस्या |
| १५. | श्रीम. असेन्ला मेन्डोंसा परेरा | सदस्या |
| १६. | श्रीम. दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |

<u>गैरहजर सदस्य – निरंक</u>

मा. सभापती :-

मा. सदस्यांचे आभार मानतो. तुमच्या नविन कारकिर्दीवर शुभेच्छा. नविन वर्षात चांगली काम होतील अशा शुभेच्छा देतो. माझ्या सभापतीच्या कारकिर्दिमध्ये ज्या सदस्यांनी, कर्मचाऱ्यांनी, अधिकारी वर्गानी सहकार्य केले त्यांचे देखील आभार मानतो. सचिवांनी आजची सभा चालू करावी.

नगरसचिव :-

सर्व नवनिर्वाचित स्थायी समिती सदस्यांचे प्रशासनातर्फे स्वागत आहे. मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. २८/१०/२०१६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरहू सभा ठरावाद्वारे सर्वानुमते तहकूब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबीत प्रकरण क्र. ७३ ते ८६ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा बुधवार दिनांक ३०/११/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात आयोजित केलेली आहे. प्र.क्र. ७३, दि. १५/०७/२०१६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

शरद पाटील :-

दि. १५/०७/२०१६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

प्रभाकर म्हात्रे :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर.

प्रकरण क्र. ७३ :-

दि. १५/०७/२०१६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र.   :-

दि. १५/०७/२०१६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. शरद पाटील                    अनुमोदन :- श्री. प्रभाकर म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ७४, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बेवर्ली पार्क, नारायण मार्बल जवळ छत्रपती शिवाजी महाराज मार्ग येथील कमानींवर दिशादर्शक फलक व जाहिरातींचे फलक प्रदर्शित करणे कामांची निविदा मंजुरीबाबत. (जाहिरात विभाग) दि. ११/०८/२०१६ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ५३)

शरद पाटील :-

सदरचा विषय हा सविस्तर परिपूर्ण माहितीसह पुढील सभेत घेण्यात यावा असा ठराव मांडत आहे.

राकेश शाह :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर

प्रकरण क्र. ७४ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बेवर्ली पार्क, नारायण मार्बल जवळ छत्रपती शिवाजी महाराज मार्ग येथील कमानींवर दिशादर्शक फलक व जाहिरातींचे फलक प्रदर्शित करणे कामांची निविदा मंजुरीबाबत. (जाहिरात विभाग) दि. ११/०८/२०१६ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ५३)

ठराव क्र. ७२ :-

सदरचा विषय हा सविस्तर परिपूर्ण माहितीसह पुढील सभेत घेण्यात यावा असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. शरद पाटील                    अनुमोदन :- श्री. राकेश शहा

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ७५, अग्निशमन दलाच्या एरियल लॅडर प्लॅटफॉर्म (टी.टी.एल.) वाहनाकरीता सेंसर व इतर साहित्य खरेदी करणेबाबत.

प्रेमनाथ पाटील :-

मिरा भाईदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या टी. टी. एल. वाहना करिता अत्यावश्यक स्पेअरपार्टस व इतर साहित्य खरेदी करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर मा. मुख्य लेखापरिक्षक यांनी दिलेल्या शेऱ्यानुसार फेर सादर करण्यात आला आहे. सदर अहवालानुसार साहित्य खरेदी करिता रु. ३७,३५,४३४/- इतक्या खर्चास मंजुरी मिळणेस मा. मुख्य लेखापरिक्षक यांनी शिफारस केलेली आहे. परंतु दि. २६/०८/२०१६ रोजी टी. टी. एल. वाहनातील सेंसर मध्ये बिघाड झाल्याने CAN Modul ID 10 & ID 11 हे खरेदी करणे करिता स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

मा. मुख्य लेखापरिक्षक यांनी अहवालावर दिलेल्या शेऱ्यानुसार CAN Modul ID 10 & ID 11 खरेदीचा प्रस्ताव व अत्यावश्यक स्पेअरपार्टस व इतर साहित्य खरेदी बाबतचा प्रस्ताव असे दोन्ही प्रस्ताव एकत्रित सादर करणेबाबत सुचविले होते. त्यानुसार अत्यावश्यक स्पेअरपार्टस व इतर साहित्य खरेदी करिता व CAN Modul ID 10 & ID 11 खरेदीचा प्रस्ताव हा एकत्रितरित्या सादर करण्यात आला आहे. त्यानुसार अत्यावश्यक स्पेअरपार्टस व इतर साहित्य खरेदी करिता रु. रु. ३७,३५,४३४/- आणी CAN Modul ID 10 & ID 11 खरेदी करिता रु. ५,१५,३४४/- असा एकुण रु. ४२,५०,७७८/- इतका खर्च अपेक्षित आहे. अग्निशमन विभाग ही अत्यावश्यक सेवा असल्याने व सद्यस्थितीत अग्निशमन विभागाकडे केवळ एकमेव टी. टी.

एल. वाहन उपलब्ध असल्याने सदर सर्व साहित्य तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे. सदर साहित्याचा सविस्तर तपशिल खालील प्रमाणे.

| Sr. No. | Item | Qty. | Rate (per Qty) | Total Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 01 | Ground Pressure Sensor unit complete CAN | 1 | 7,80,791/- | 7,80,791/- |
| 02 | Load Measuring Pin 100 kn | 2 | 7,63,140/- | 15,26,280/- |
| 03 | Load Measuring Pin 130 kn | 1 | 7,06,304/- | 7,06,304/- |
| 04 | Electronic board for load sensing | 2 | 3,21,790/- | 6,43,580/- |
| 05 | Box | 1 | 21,884/- | 21,884/- |
| 06 | Cover | 1 | 10,092/- | 10,092/- |
| 07 | ¨Multiple connector 32-pole for crimp contact | 2 | 1,570/- | 3,140/- |
| 08 | Lense head screw | 4 | 106/- | 424/- |
| 09 | Crimp contact 0,25-0,56 QMM for female multipoint c | 32 | 106 | 3,392/- |
| 10 | Crimp contact 0,75-1,50 QMM for female multipoint c | 6 | 113/- | 678/- |
| 11 | Flange socket M12/PG9 BU 8-pole | 3 | 7,623/- | 22,869/- |
| 12 | Can modul ID 10 & 11 | 1 | 5,15,344/- | 5,15,344/- |
| **TOTAL** | | | | **42,34,778/-** |
| | | | **Freight** | **16,000/-** |
| **GRAND TOTAL** | | | | **Rs. 42,50,778/-** |

मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोलुशन प्रा. लि. यांनी सादर केलेल्या उपरोक्त नमुद दरानुसार वरील नमुद साहित्य खरेदी करीता रु. ४२,५०,७७८/- इतका खर्च अपेक्षीत आहे. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात साधनसामुग्री व भंडारे या लेखाशिर्षाअंतर्गत रु. १५०.०० लाख इतकी तरतुद करण्यात आली असुन सदर तरतुदीतुन केलेला खर्च व वरिल नमुद रक्कम रु. ४२,५०,७७८/- वजा जाता सद्यस्थितीत रु. ८३,२७,४२७/- इतकी तरतुद शिल्लक राहणार आहे.

तरी अग्निशमन विभागाची आवश्यकता लक्षात घेता अग्निशमन विभागातील टी.टी.एल वाहनाकरीता अत्यावश्यक स्पेअरपार्टस व इतर साहित्य खरेदी करीता वरील तक्त्यात नमुद केल्यानुसार रुपये ४२,५०,७७८/- इतक्या खर्चास ही मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

प्रभाकर म्हात्रे :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर

प्रकरण क्र. ७५ :-

अग्निशमन दलाच्या एरियल लॅडर प्लॅटफॉर्म (टी.टी.एल.) वाहनाकरीता सेंसर व इतर साहित्य खरेदी करणेबाबत.

ठराव क्र. ७३ :-

मिरा भाईदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या टी. टी. एल. वाहना करिता अत्यावश्यक स्पेअरपार्टस व इतर साहित्य खरेदी करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर मा. मुख्य लेखापरिक्षक यांनी दिलेल्या शेऱ्यानुसार फेर सादर करण्यात आला आहे. सदर अहवालानुसार साहित्य खरेदी करिता रु. ३७,३५,४३४/- इतक्या खर्चास मंजुरी मिळणेस मा. मुख्य लेखापरिक्षक यांनी शिफारस केलेली आहे. परंतु दि. २६/०८/२०१६ रोजी टी. टी. एल. वाहनातील सेंसर मध्ये बिघाड झाल्याने CAN Modul ID 10 & ID 11 हे खरेदी करणे करिता स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

मा. मुख्य लेखापरिक्षक यांनी अहवालावर दिलेल्या शेऱ्यानुसार CAN Modul ID 10 & ID 11 खरेदीचा प्रस्ताव व अत्यावश्यक स्पेअरपार्टस व इतर साहित्य खरेदी बाबतचा प्रस्ताव असे दोन्ही प्रस्ताव एकत्रित सादर करणेबाबत सुचविले होते. त्यानुसार अत्यावश्यक स्पेअरपार्टस व इतर साहित्य खरेदी करिता व CAN Modul ID 10 & ID 11 खरेदीचा प्रस्ताव हा एकत्रितरित्या सादर करण्यात आला आहे. त्यानुसार अत्यावश्यक स्पेअरपार्टस व इतर साहित्य खरेदी करिता रु. रु. ३७,३५,४३४/- आणी CAN Modul ID 10 & ID 11 खरेदी करिता रु. ५,१५,३४४/- असा एकुण रु. ४२,५०,७७८/- इतका खर्च अपेक्षित आहे. अग्निशमन विभाग ही अत्यावश्यक सेवा असल्याने व सद्यस्थितीत अग्निशमन विभागाकडे केवळ एकमेव टी. टी. एल. वाहन उपलब्ध असल्याने सदर सर्व साहित्य तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे. सदर साहित्याचा सविस्तर तपशिल खालील प्रमाणे.

| Sr. No. | Item | Qty. | Rate (per Qty) | Total Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 01 | Ground Pressure Sensor unit complete CAN | 1 | 7,80,791/- | 7,80,791/- |
| 02 | Load Measuring Pin 100 kn | 2 | 7,63,140/- | 15,26,280/- |
| 03 | Load Measuring Pin 130 kn | 1 | 7,06,304/- | 7,06,304/- |
| 04 | Electronic board for load sensing | 2 | 3,21,790/- | 6,43,580/- |
| 05 | Box | 1 | 21,884/- | 21,884/- |
| 06 | Cover | 1 | 10,092/- | 10,092/- |
| 07 | ¨Multiple connector 32-pole for crimp contact | 2 | 1,570/- | 3,140/- |
| 08 | Lense head screw | 4 | 106/- | 424/- |
| 09 | Crimp contact 0,25-0,56 QMM for female multipoint c | 32 | 106 | 3,392/- |
| 10 | Crimp contact 0,75-1,50 QMM for female multipoint c | 6 | 113/- | 678/- |
| 11 | Flange socket M12/PG9 BU 8-pole | 3 | 7,623/- | 22,869/- |
| 12 | Can modul ID 10 & 11 | 1 | 5,15,344/- | 5,15,344/- |
| **TOTAL** | | | | **42,34,778/-** |
| | | | **Freight** | **16,000/-** |
| **GRAND TOTAL** | | | | **Rs. 42,50,778/-** |

मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोलुशन प्रा. लि. यांनी सादर केलेल्या उपरोक्त नमुद दरानुसार वरील नमुद साहित्य खरेदी करीता रु. ४२,५०,७७८/- इतका खर्च अपेक्षीत आहे. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात साधनसामुग्री व भंडारे या लेखाशिर्षाअंतर्गत रु. १५०.०० लाख इतकी तरतुद करण्यात आली असुन सदर तरतुदीतुन केलेला खर्च व वरिल नमुद रक्कम रु. ४२,५०,७७८/- वजा जाता सद्यस्थितीत रु. ८३,२७,४२७/- इतकी तरतुद शिल्लक राहणार आहे.

तरी अग्निशमन विभागाची आवश्यकता लक्षात घेता अग्निशमन विभागातील टी.टी.एल वाहनाकरीता अत्यावश्यक स्पेअरपार्टस व इतर साहित्य खरेदी करीता वरील तक्त्यात नमुद केल्यानुसार रुपये ४२,५०,७७८/- इतक्या खर्चास ही मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील अनुमोदन :- श्री. प्रभाकर म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ७६, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्मशानभुमी करिता जळाऊ लाकडे पुरवठा कामाच्या निविदेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

राकेश शाह :-

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील १४ ठिकाणच्या स्मशानभुमीकरीता जळाऊ लाकडे खरेदी करणे कामाची निविदा मागविणेस व याकामी येणारा खर्च रु. ५०.०० लक्ष खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे. निविदेस अंतिम मंजूरी प्राप्त होईपर्यंत, सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या निविदाकारकाकडून स्मशानभुमीकरीता जळाऊ लाकडे पुरवठा करणे कामी येणाऱ्या रु. ५०.०० लक्ष खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

प्रेमनाथ पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर

प्रकरण क्र. ७६ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्मशानभुमी करिता जळाऊ लाकडे पुरवठा कामाच्या निविदेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

ठराव क्र. ७४ :-

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील १४ ठिकाणच्या स्मशानभुमीकरीता जळाऊ लाकडे खरेदी करणे कामाची निविदा मागविणेस व याकामी येणारा खर्च रु. ५०.०० लक्ष खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे. निविदेस अंतिम मंजूरी प्राप्त होईपर्यंत, सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या निविदाकारकाकडून स्मशानभुमीकरीता जळाऊ लाकडे पुरवठा करणे कामी येणाऱ्या रु. ५०.०० लक्ष खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ७७, भाईंदर (प.) मोदी पटेल रोड येथील साईबाबा उद्यानलगत पाणपोईचा शटर लावलेला गाळा क्र. ०१ भाड्याने देणेस मान्यता मिळणेबाबत.

शरद पाटील :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) मनपाच्या मालकीचा मोदी पटेल रोड येथील साईबाबा उद्यानालगत पाणपोईचा शटर लाविलेला गाळा क्र. ०१ आहे. सदर जागेचे चालु बाजार भावा प्रमाणे म्हणजे शीघ्र गणकानुसार रु.२२,७२२/- प्रति वर्ष एवढे भाडे ठरविण्यात आले असुन सदर कामासाठी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार श्री. गुलजार बच्चन सिंह भाईंदर (प.) यांनी दर वाढवुन घेण्यासाठी पत्र देऊन निविदा समिती समोर बोलविले असता रु.२५,०००/- प्रति वर्ष दर सादर केले आहेत. सदर भाडे हे चालु बाजार भावानुसार जास्त असल्याने सदर निविदाधारकास सदर जागा ५ वर्ष मुदतीसाठी करारनामा करुन भाडयाने देण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७९ (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

राकेश शहा :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर

प्रकरण क्र. ७७ :-

भाईंदर (प.) मोदी पटेल रोड येथील साईबाबा उद्यानलगत पाणपोईचा शटर लावलेला गाळा क्र. ०१ भाड्याने देणेस मान्यता मिळणेबाबत.

ठराव क्र. ७५ :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) मनपाच्या मालकीचा मोदी पटेल रोड येथील साईबाबा उद्यानालगत पाणपोईचा शटर लाविलेला गाळा क्र. ०१ आहे. सदर जागेचे चालु बाजार भावा प्रमाणे म्हणजे शीघ्र गणकानुसार रु.२२,७२२/- प्रति वर्ष एवढे भाडे ठरविण्यात आले असुन सदर कामासाठी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार श्री. गुलजार बच्चन सिंह भाईंदर (प.) यांनी दर वाढवुन घेण्यासाठी पत्र देऊन निविदा समिती समोर बोलविले असता रु.२५,०००/- प्रति वर्ष दर सादर केले आहेत. सदर भाडे हे चालु बाजार भावानुसार जास्त असल्याने सदर निविदाधारकास सदर जागा ५ वर्ष मुदतीसाठी करारनामा करुन भाडयाने देण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७९ (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. शरद पाटील अनुमोदन :- श्री. राकेश शाह

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ७८, परिवहन विभागाच्या पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देणेबाबत.

शरद पाटील :-

मा. सभापती महोदय परिवहनचा विषय आता आमच्या हातात आला त्याची आम्हाला पहिली माहिती द्यावी.

कल्पिता पिंपळे वडे :-

रि-ॲप्रोप्रिएशन करतो एक हेडमधून दूस-या हेडमध्ये खर्च करतो जी.सी.सी तत्वावर चालवण्यासाठी १८ कोटीची तरतूद केली होती. त्याच्यामध्ये मूळ अनूदान होत आतापर्यत ९६,९०,६८८ खर्च झालेला आहे. आपल्याला १.६५ लाख लागणार आहेत. आपण जी.सी.सी तत्वावर चालवणार म्हणजे आपण कसे ठरवले होते २-३ महिण्यात जी.सी.सी. तत्वावर जाईल त्याच्यात तरतूद जास्त ठेवली होती अजून त्या तत्वावर बस गेलेली नाही. त्यामूळे खर्च करायला लागणारच आहे. हा खर्च आपण ह्याच्यासाठी वापरतो . सर फ्रॉममध्ये बघा मूळ अनूदान रू. १८ कोटी इंधन वंगन स्पेअर पार्ट मधली तरतूद संपलेली आहे. तिथे तो आपण वापरतो आपण जो

परिवहनचा बजेट केला त्या बजेटमध्ये जी.सी.सी तत्वावर चालवण्यासाठी येणारा खर्च ह्या हेडमध्ये १८ कोटीची तरतूद केलेली आहे जी.सी.सी. तत्वावर बस चालू झालेली नाही त्याच्यातले पैसे आपण वापरतो.

प्रेमनाथ पाटील :-

इंधन,वंगण जून्या बसचा खर्च लावला असेल ना.

कल्पिता पिंपळे वडे :-

जून्या नाही ज्या नविन घेतल्या आहेत त्याच्यासाठी जी.सी.सी तत्वावर जेव्हा आपण चालवणार होतो तेव्हा डिझेलचा खर्च ऑपरेशनचा खर्च सगळा तो ऑपरेटर करणार होता. आता आपल्याकडे ऑपरेटरच नाही. आता आपण चालवतो म्हणजे डिझेलचा खर्च लागणार नाही. बाकी खर्च येणार त्याचे स्पेअर पार्ट त्याचा पण खर्च लागणार ती तरतूद इथली कमी पडली.

प्रेमनाथ पाटील :-

आपण कंपनी कोणती घेणार होतो.

कल्पिता पिंपळे वडे :-

ती निविदा प्रक्रिया चालू आहे.

शरद पाटील :-

मॅडम आपल्याकडे बस किती आहेत.

कल्पिता पिंपळे वडे :-

आपल्याकडे ४७ बसेस आहेत.

शरद पाटील :-

चालू किती आहेत.

कल्पिता पिंपळे वडे :-

३५ बस चालू आहेत.

शरद पाटील :-

किती बंद आहेत.

कल्पिता पिंपळे वडे :-

१२ बंद आहेत.

शरद पाटील :-

का बंद आहेत?

कल्पिता पिंपळे वडे :-

तो टायर्सचा इश्यू झालेला आहे. टायर्स जे आहेत त्याचे दरपत्रक मागवली होती. दरपत्रकानुसार आपण ते टायर्स मागवून घेतले. त्याच्या नंतर काय झाले दरपत्रक न मागवता अजून जी.सी.सी चा ऑपरेटर मिळायला वेळ जाणार आहे त्याच्यामूळे त्याची निविदा प्रक्रिया करावी असा निर्णय झाला ती निविदा प्रक्रिया शॉट पिरेडची काढली आहे.

शरद पाटील :-

बसेस बंद आहेत त्याला किती दिवस झाले.

कल्पिता पिंपळे वडे :-

१०-१२ दिवस झाले असतील.

शरद पाटील :-

नाही १०-१२ दिवस काय बोलता कितीतरी महिने होऊन गेले. तुमच्या बसेस बंद आहेत. मॅडम आम्हाला खरी माहिती द्या नाहीतर हा विषय आम्ही पुढच्या मिटींगला करु. हा विषय पेन्डींग ठेवा पुढच्या मिटींगला घ्या. खरी माहिती द्या किती महिने झाले ते सांगा.

कल्पिता पिंपळे वडे :-

कमी अधिक प्रमाणात बंद असतात. टायर्सच्या अभावी..........

शरद पाटील :-

मॅडम टायर्सच्या अभावी बंद आहेत. आपल्याकडे ड्रायव्हर किती आहेत.

कल्पिता पिंपळे वडे :-

आपल्याकडे ड्रायव्हर व कंडक्टर मिळून एकूण ३०० कर्मचारी आहेत.

शरद पाटील :-

आपल्या टायरला खर्च किती येतो.

कल्पिता पिंपळे वडे :-

एका टायर्सची किंमत साधारण २६ ते २७ हजार आहे.

शरद पाटील :-

किती टायर लागतील.

कल्पिता पिंपळे वडे :-

रिक्वायरमेन्ट ६० टायर्सची आहे.

शरद पाटील :-

१२ लाख रु. झाले. आपले जे ड्रायव्हर बसले आहेत त्यांना पगार किती आहे. आम्ही बोलतो त्याचे उत्तर द्या. कधी कमी केले आणि किती पगार आहे ते सांगा.

कल्पिता पिंपळे वडे :-

१५ ते १६ हजारपर्यंत.

शरद पाटील :-

असे किती ड्रायव्हर आहेत जे बसून आहेत.

वेंचर मेन्डोंसा :-

मॅडम तुम्ही जेव्हा पण मिटींगला याल ना तुम्ही स्टडी करुन या. तुम्हालाच माहित नाही काय आहे काय नाही तुम्ही स्टडी करुन येत नाही. तुम्ही नविन बसेस आणल्या त्याची स्टेपनी टायर होती ती जूनी होती. बस सुभाषचंद्र बोस मैदानाकडे पंक्चर झालेली तिथे त्या ड्रायव्हरनी स्टेपनी काढली तर स्टेपनी पंक्चर होती. नविन बस तर ते टायर कुठे गेले. नविन बसला नविन स्टेपनी येते की नाही.

कल्पिता पिंपळे वडे :-

हो.

वेंचर मेन्डोंसा :-

मग स्टेपनी गेली कुठे. मॅडम ह्याच्यावर लक्ष द्या. बसेस नविन येतात स्टेपनी जुन्या कशा. म्हणजे आपल्या नविन स्टेपनी कुठे जातात.

शरद पाटील :-

मॅडम आपले जे ड्रायव्हर बसले आहेत त्यांना पगार किती जातो.

कल्पिता पिंपळे वडे :-

आता तो पगार बंद केला आहे ना.

शरद पाटील :-

नाही बंद कधी केला आणि जोपर्यंत बस बंद होत्या त्यांना पगार चालू होता असे किती दिवस आणि त्यांना बंद केले ते किती दिवस.

कल्पिता पिंपळे वडे :-

ती माहिती काढून देते.

शर्मिला बगाजी :-

आम्ही थांबतो.

शरद पाटील :-

हा विषय शेवटी घेऊ त्याच्यात निर्णय होत असेल तर बघू. नाहीतर पुढच्या मिटींगला घेऊ.

नगरसचिव :-

**प्रकरण क्र. ७९,** TAB VILDAGLIPTIN 50 MG **शासन दरकरारानुसार खरेदी करणेबाबत. (वैद्यकीय विभाग)**

प्रेमनाथ पाटील :-

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व आरोग्य केंद्र व रुग्णालयामधून मधुमेह (**DEABETIS**) यावर उपचार करीता** TAB GLIBENCLAMIBE 5 MG **व** TAB METFORMIN 500 MG **ही औषधे वापरण्यात येतात.**

**भाईंदर (प.) येथे भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय नव्याने सुरु झालेली आहे. सदर रुग्णालयातील तज्ञ वैद्यकिय अधिकारी यांनी उपरोक्त औषधांसोबत नव्याने आलेले** TAB VILDAGLIPTIN 50 MG **हे औषध खरेदी करण्यास सुचविले आहे. ही औषधे मधुमेहावर त्वरीत उपचाराकरीता फायदेशीर आहेत.**

TAB VILDAGLIPTIN 50 MG **या औषधाकरीता मनपाचे दर मंजूर नाहीत. निविदा मागवून खरेदी करणेस बराच कालावधी लागणार आहे. सदर औषधांकरीता संचालक वैद्यकिय शिक्षण व संशोधन यांचे** DMER/D&M/DPC/E- Short Tender No. 751/Tab-Cap/1703-1716/2016 Dt. 20/06/2016 **नुसार मे. नोवार्टीस हेल्थकेअर प्रा.लि. यांचे रु. २३९.१२ प्रती १४ गोळ्या असे दर दि. १९/०६/२०१८ पर्यंत मंजूर आहेत.**

TAB VILDAGLIPTIN 50 MG **च्या ४००० स्ट्रीप्स खरेदी करणेकरीता व याकामी येणाऱ्या रु. ९,५६,४८०/- खर्चास ही स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.**

प्रभाकर म्हात्रे :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर.

प्रकरण क्र. ७९ :-

TAB VILDAGLIPTIN 50 MG शासन दरकरारानुसार खरेदी करणेबाबत. (वैद्यकीय विभाग)

ठराव क्र. ७७ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व आरोग्य केंद्र व रुग्णालयामधून मधुमेह (DEABETIS) यावर उपचार करीता TAB GLIBENCLAMIBE 5 MG व TAB METFORMIN 500 MG ही औषधे वापरण्यात येतात.

भाईंदर (प.) येथे भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय नव्याने सुरु झालेली आहे. सदर रुग्णालयातील तज्ञ वैद्यकिय अधिकारी यांनी उपरोक्त औषधांसोबत नव्याने आलेले TAB VILDAGLIPTIN 50 MG हे औषध खरेदी करण्यास सुचविले आहे. ही औषधे मधुमेहावर त्वरीत उपचाराकरीता फायदेशीर आहेत.

TAB VILDAGLIPTIN 50 MG या औषधाकरीता मनपाचे दर मंजूर नाहीत. निविदा मागवून खरेदी करणेस बराच कालावधी लागणार आहे. सदर औषधांकरीता संचालक वैद्यकिय शिक्षण व संशोधन यांचे DMER/D&M/DPC/E- Short Tender No. 751/Tab-Cap/1703-1716/2016 Dt. 20/06/2016 नुसार मे. नोवार्टीस हेल्थकेअर प्रा.लि. यांचे रु. २३९.१२ प्रती १४ गोळ्या असे दर दि. १९/०६/२०१८ पर्यंत मंजूर आहेत.

TAB VILDAGLIPTIN 50 MG च्या ४००० स्ट्रीप्स खरेदी करणेकरीता व याकामी येणाऱ्या रु. ९,५६,४८०/- खर्चास ही स्थायी समिति सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील अनुमोदन :- श्री. प्रभाकर म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ८०, निविदांना मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग) प्रकरण क्र. ८१, निविदांना मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

दिपक खांबित :-

प्रकरण क्र. ८० आणि ८१ हे दोन्ही मागच्या वेळेला मंजूर झाले आहेत. दोन्ही विषय प्रशासनाकडून मागे घेतो.

मा. सभापती :-

चुकून आले का?

दिपक खांबित :-

सचिवांची बदली झाल्यामुळे त्यांना माहित नाही.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ८२, निविदांना मान्यता देणे. (सार्व. आरोग्य विभाग)

शरद पाटील :-

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका सार्व. आरोग्य विभागाकरीता डास नाशके /अळी नाशके पुरवठा करणे कामी पात्र निविदाकारांनी सादर केलेल्या दरात वाटाघाटी करून खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | डास नाशके/ डास अळी नाशकाचे नाव | निविदेतील पात्र निविदाकाराचे नाव | वाटाघाटी नंतर सादर केलेले दर |
|---|---|---|---|
| 1 | M.L.O. Oil | मे. डॉपमन्स पेस्ट कंन्ट्रोल ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस | रु. 74/- प्रती लिटर |
| 2 | Temephos 50% E.C. ISI Mark | मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन | रु. 1175/- प्रती लिटर |
| 3 | Pyrosene oil - E ISI Mark | मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन | रु. 690/- प्रती लिटर |
| 4 | Bifenthrin 10% WP ISI Mark | मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन | रु. 3900/- प्रती किलो |
| 5 | Polydimethylsiloxane (PDMS) 70% | मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन | रु. 4750/- प्रती लिटर |
| 6 | Bacillus Thuringiensis Israelensis Bti H-14 Liquid (TAC Approved) | मे. लक्षता ट्रेडींग कॉर्पोरेशन | रु. 1390/- प्रती लिटर |
| 7 | Diflubenzeron 2% Tablet | मे. लक्षता ट्रेडींग कॉर्पोरेशन | रु. 49/- प्रती 05 ग्रॅम |
| 8 | Cyfluthrin 5% EW | मे. लक्षता ट्रेडींग कॉर्पोरेशन | रु. 1940/- प्रती लिटर |
| 9 | Imadacilopríd 0.5% RB | मे. लक्षता ट्रेडींग कॉर्पोरेशन | रु. 98/- प्रती 50 ग्रॅम |
| 10 | Cyphenothrin 5% EC | मे. लक्षता ट्रेडींग कॉर्पोरेशन | रु. 1130/- प्रती लिटर |

| अ.क्र. | डास नाशके/ डास अळी नाशकाचे नाव | निविदेतील पात्र निविदाकाराचे नाव | वाटाघाटी नंतर सादर केलेले दर |
|---|---|---|---|
| 11 | Deltamethrin 2.5% SC | मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन | रु. 660/- प्रती लिटर |
| 12 | Alphacypermetrin 10% SC | मे. डॉपमन्स पेस्ट कंन्ट्रोल ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस | रु. 540/- प्रती लिटर |
| 13 | Neem oil Based (EC) Formulation containing AZABIRACHTIN (minimum) 0.15% CIB Approved in Public Health | मे. अभिश्री ट्रेडर्स ॲन्ड सप्लायर्स | रु. 2900/- प्रती लिटर |

वरीलप्रमाणे डास नाशके /अळी नाशके पुरवठा कामाचे वाटाघाटी नंतर सादर केलेले दर स्विकारणेस ही सभा मंजुरी देत आहे. सदर अळीनाशके कीटकनाशके रुपये १.८० कोटी खर्चाच्या मर्यादे पर्यत खरेदी करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

प्रेमनाथ पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

राकेश शाह :-

मा. महासभेमध्ये झालेल्या चर्चेनुसारर महानगरपालिका क्षेत्रात धुर फवारणी करणे कामी ५० फॉग मशिन खरेदी करणे कामाच्या ई-टेंडरींगद्वारे निविदा मागविणे व या कामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. त्याचप्रमाणे फॉग मशिन वापरा करीता लागणारे ५० कंत्राटी सफाई कामगार मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा.लि. यांचेकडून मंजुर दरात उपलब्ध करून घेणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

मा. सभापती :-

ठराव सुचनेसह मंजूर.

असेन्ला परेरा :-

ह्याच्यामध्ये अमाऊन्टचे टेंडर आहे ते डिसक्लोज झाले नाही.

शरद पाटील :-

ह्याच्यात वाढेल पण ह्याची आपल्याला जरुरी आहे.

तारा घरत :-

फवारणी होतच नाही. डेंग्युचे पण भरपूर पेशंट भेटतात.

संभाजी पानपट्टे :-

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो आता ५० मंजूर झाल्यानंतर घेणार आहोत.

मर्लिन डिसा :-

पानपट्टे साहेब आपल्या शहरात डेंग्यू व्हिक्टीम किती आहेत.

डॉ. प्रकाश जाधव :-

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो, जून,जुलै, ऑगस्ट मध्ये ॲव्हरेज पर मंथ साधारण २५० सस्पेक्टेड केसेस होत्या. ह्या सस्पेक्टेड केसेस आहेत. डेंग्यु अनेसमेन्ट पॉझिटिव्ह केसेस आहेत. कन्फम केसेस नाही. आता त्याची आरोग्य फ्रिक्वेन्सी कमी झाल्या दॅट ॲज कम अपटू अराऊंड १०० ॲन्ड १२० पर मंथ.

मर्लिन डिसा :-

बट नाव द लेटेस्ट धिस इयर इट्स मोर दॅन प्रिव्हियस डेंग्यु पेशन्ट एवढे वाढले आहेत की एव्हरी सेकंड बिल्डींग एव्हरी सेकंड फॅमिली छोट्या-छोट्या मुलांना पण डेंग्यु होत आहे.

डॉ. प्रकाश जाधव :-

मॅडम मी मान्य करतो ह्या वर्षी फिवरच्या केसेस जास्त आहेत आणि ॲनेसमेन्ट टेस्ट बऱ्याच प्रमाणात पॉझिटिव्ह आले आहे.

मर्लिन डिसा :-

आपल्याकडे सर्व्हे चालु नाही का?

डॉ. प्रकाश जाधव :-

सर्व्हे चालु आहे.

मर्लिन डिसा :-

मग त्याच्यात कळ्ले नाही का?

शरद पाटील :-

मा. सभापती महोदय तुम्ही बोलता तुम्ही मान्य पण करता फवारणी जी चालू आहे तारा मॅडम बोलल्या काय चूकीचे नाही. सगळ्यांनी त्या विषयावर बोलणे बरोबर नाही. त्या फवारणीवर लक्षच नाही ते जे मिक्सींग करतात त्याच्यावर कोणाचे लक्ष आहे.

मर्लिन डिसा :-

मला एकाने असे विचारले की मॅडम आमच्याकडे वॉटर बॉटलमध्ये मच्छरसाठी औषध देतात तुम्ही देणार का? मी बोलले कोण औषध देते. एक पर्टीक्युलर एरिया दाखवली की इथे पालिकेचे कर्मचारी बसतात. काहीतरी पैसे घेऊन वाटप चालू आहे. मच्छर मारण्याचे औषध.

डॉ. प्रकाश जाधव :-

नगरपालिकेचे कर्मचारी सोडले तर बाकी जो स्टाफ आहे त्यांना आपण रितसर पध्दतीनेच देतो.

मर्लिन डिसा :-

त्याच्यात डायल्यूट करुन............

डॉ. प्रकाश जाधव :-

डायल्यूट करुनच देतो.

मर्लिन डिसा :-

पण ते प्रॉपर प्रपोशन वापरत नसतील ना. हे मला कोणीतरी जेन्युअल लोकांनी विचारले आहे. तर मला शॉक लागला.

डॉ. प्रकाश जाधव :-

मी क्रॉस चेक करतो.

मर्लिन डिसा :-

क्रॉस चेक करा आणि त्याच्यावर वॉच ठेवा प्रत्येक प्रभागात.

शर्मिला बगाजी :-

मा. सभापती साहेब आपल्या परवानगीने बोलते, डॉ. साहेब आपल्याकडे फवारणीचे काम आपल्यामार्फत होते. ते एम.पी.डब्ल्यू करतात तर एम.पी.डब्ल्यू किती आहेत.

डॉ. प्रकाश जाधव :-

आपल्याकडे टोटल २८ एम.पी.डब्ल्यू आहेत. सॅक्शन एम.पी.डब्ल्यू ४० आहेत आपण १२ एम.पी.डब्ल्यू घेऊ शकतो. त्याच्या मागणीसाठी आस्थापनाकडे लेटर दिले आहे. अजून १२ एम.पी.डब्ल्यू घेतले तर काम नक्कीच वाढेल आणि २८ आहेत ते १०० टक्के सगळे येतात.

शर्मिला बगाजी :-

उत्तनमध्ये एम.पी.डब्ल्यू आहेत ते बदली करुन घ्या. सध्या त्याच्यावरच लोड आहे. कारण ती सेन्सेटिव्ह एरिया आहे. तिथे डासाचा प्रार्दुभाव जास्त आहे. तिकडे फक्त २ एम.पी.डब्ल्यू आहेत. तिथे कधी एक येतो मग तिकडे कोणाचेच लक्ष नसते. सध्या सफाई कामगाराकडे फवारणी नसल्यामुळे एम.पी.डब्ल्यूची कमतरता आहे. ते तिथे जाणवते. तिकडे जास्तीत जास्त एम.पी.डब्ल्यू द्या.

मर्लिन डिसा :-

मला गोष्ट सर्वांच्या निर्दशनास आणायची आहे. माझ्या बिल्डींगमध्ये सर्व्हे करायला औषध फवारणी करणारा मुलगा खांद्यावर मशिन घेऊन घरोघरी जाऊन तो सर्व्हे करतो. ते औषध फवारणी करणाऱ्या स्टाफला सांगितले आहे का? मी त्यांचा फोटो घेतला आहे.

डॉ. प्रकाश जाधव :-

आता जे नविन औषध आहे. सेल्फाय ते घराच्या आतमध्ये डक्समध्ये मारले ना तर त्याचा इफेक्ट एक महिना राहतो. तो मॉस्कोटो त्या ठिकाणी बसला तर त्याचा सोडियम इन बॅलेन्स होऊन ही विल डाय. ही त्याची ॲक्शन आहे. त्याच्यामुळे आपण जास्तीत जास्त रिक्वायरमेन्टप्रमाणे मारले तर एक महिन्यापर्यंत तिथे मच्छर येणार नाही आणि ते आता चालू आहे.

मर्लिन डिसा :-

फॅमेली सर्व्हे पण आता चालू आहे. प्रत्येक मेंबरचे नाव, एज, डेट ऑफ बर्थ ॲन्ड एव्हरी डीटेल पिपल आर गेटिंग सस्पेशियस ॲन्ड द आस्कींग वॅट इज डिटेल्स आयडी कार्ड आहे. मला व्हॉट्स अपवर पाठवतात आणि विचारतात आज काल सोसायटीमध्ये लोक घाबरतात ना.

शरद पाटील :-

मी तुम्हाला एक प्रश्न विचारला होता. मिक्सींग करतात त्याच्यावर कोणाचे नियंत्रण आहे. जो नगरसेवक त्या वॉर्डाचा आहे तो करतो. तेवढच आहे जिथे लोकप्रतिनिधी लक्ष घालत नसेल तिथे कसही मिक्सींग चालते फक्त पाणी मारले जाते.

डॉ. प्रकाश जाधव :-

डायलुशन जे आहे ते एम.पी.डब्ल्यू आणि स्प्रे वर्कर एम.पी.डब्ल्यू स्वतः समोर डायलूट करुन त्यांना देतो. म्हणजे देयर इज प्रॉब्लेम मिक्सींग देन एम.पी.डब्ल्यू रिस्पॉन्सिबल. त्यामुळे शक्यतो प्रॉब्लेम यायला नाही पाहिजे.

शरद पाटील :-

मिक्सींगची जबाबदारी कोणाची आहे.

डॉ. प्रकाश जाधव :-

मिक्सींगची जबाबदारी एम.पी. डब्ल्युची आहे.

शरद पाटील :-

त्याच्यावर लक्ष कोण देते. त्यांची नाव आणि नंबर द्या आम्ही त्यांना कॉन्टॅक्ट करु. ते तर आमच्याकडे कधीच येत नाही. लोकप्रतिनधीकडे कोण कॉन्टॅक्ट करतच नाही. आम्हीच करतो. आम्हालाच जरुरत आहे.

डॉ. प्रकाश जाधव :-

एम.पी.डब्ल्यूकडून काही चुका होत असतील तर त्याला जबाबदार मेडीकल ऑफिसर आहे. हेल्थ सेन्टर व्हाईज आपण त्यांना डीस्ट्रीब्यूट केलेले आहे.

शरद पाटील :-

आम्हाला सांगा प्रभाग व्हाईज कोण कोण आहे. तुम्ही प्रभाग व्हाईज सर्व सदस्यांना लेटर पाठवून द्या त्याचे नाव आणि नंबर पाठवून द्या.

वर्षा भानुशाली :-

मिक्सींग कोणत्या ठिकाणी करता.

डॉ. प्रकाश जाधव :-

मिक्सींग आपण हेल्थ सेन्टरमध्येच करतो.

प्रकरण क्र. ८२ :-

निविदांना मान्यता देणे. (सार्व. आरोग्य विभाग)

ठराव क्र. ७८ :-

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका सार्व. आरोग्य विभागाकरीता डास नाशके /अळी नाशके पुरवठा करणे कामी पात्र निविदाकारांनी सादर केलेल्या दरात वाटाघाटी करून खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | डास नाशके/ डास अळी नाशकाचे नाव | निविदेतील पात्र निविदाकाराचे नाव | वाटाघाटी नंतर सादर केलेले दर |
|---|---|---|---|
| 1 | M.L.O. Oil | मे. डॉपमन्स पेस्ट कंन्ट्रोल ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस | रु. 74/- प्रती लिटर |
| 2 | Temephos 50% E.C. ISI Mark | मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन | रु. 1175/- प्रती लिटर |
| 3 | Pyrosene oil - E ISI Mark | मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन | रु. 690/- प्रती लिटर |
| 4 | Bifenthrin 10% WP ISI Mark | मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन | रु. 3900/- प्रती किलो |
| 5 | Polydimethylsiloxane (PDMS) 70% | मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन | रु. 4750/- प्रती लिटर |
| 6 | Bacillus Thuringiensis Israelensis Bti H-14 Liquid (TAC Approved) | मे. लक्षता ट्रेडींग कॉर्पोरेशन | रु. 1390/- प्रती लिटर |
| 7 | Diflubenzeron 2% Tablet | मे. लक्षता ट्रेडींग कॉर्पोरेशन | रु. 49/- प्रती 05 ग्रॅम |
| 8 | Cyfluthrin 5% EW | मे. लक्षता ट्रेडींग कॉर्पोरेशन | रु. 1940/- प्रती लिटर |
| 9 | Imadaciloprid 0.5% RB | मे. लक्षता ट्रेडींग कॉर्पोरेशन | रु. 98/- प्रती 50 ग्रॅम |
| 10 | Cyphenothrin 5% EC | मे. लक्षता ट्रेडींग कॉर्पोरेशन | रु. 1130/- प्रती लिटर |
| 11 | Deltamethrin 2.5% SC | मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन | रु. 660/- प्रती लिटर |
| 12 | Alphacypermetrin 10% SC | मे. डॉपमन्स पेस्ट कंन्ट्रोल ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस | रु. 540/- प्रती लिटर |
| 13 | Neem oil Based (EC) Formulation containing AZABIRACHTIN (minimum) 0.15% CIB Approved in Public Health | मे. अभिश्री ट्रेडर्स ॲन्ड सप्लायर्स | रु. 2900/- प्रती लिटर |

वरीलप्रमाणे डास नाशके /अळी नाशके पुरवठा कामाचे वाटाघाटी नंतर सादर केलेले दर स्विकारणेस ही सभा मंजुरी देत आहे. सदर अळीनाशके कीटकनाशके रुपये १.८० कोटी खर्चाच्या मर्यादे पर्यत खरेदी करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. शरद पाटील अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील

सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. राकेश शाह यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.

मा. महासभेमध्ये झालेल्या चर्चेनुसारर महानगरपालिका क्षेत्रात धुर फवारणी करणे कामी ५० फॉग मशिन खरेदी करणे कामाच्या ई-टेंडरींगद्वारे निविदा मागविणे व या कामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

त्याचप्रमाणे फॉग मशिन वापरा करीता लागणारे ५० कंत्राटी सफाई कामगार मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा.लि. यांचेकडून मंजुर दरात उपलब्ध करून घेणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ८३, मा. आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेल्या निविदेचे अवलोकन करणेबाबत. (पे ॲन्ड पार्क विभाग) प्रकरण क्र. ८४, मा. आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेल्या निविदेचे अवलोकन करणेबाबत. (पे ॲन्ड पार्क विभाग)

शरद पाटील :-

ह्याच्यावर आमचा एक ठराव आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मौजे नवघर सर्व्हे क्र. ३८७/२,७ (जुना), १५८/२,७ (नविन) या जागेखाली आरक्षण क्र. २६४ (अे) पे ॲन्ड पार्क चालविण्याचे अथवा वापरण्याचे धोरण मा. महासभेत ठरविलेले नाही. म्हणून परस्पर निविदा काढून मान्य करणे बेकायदेशीर होईल. तरी सदरचा विषय मा. महासभेत मंजुरी घेवून त्यानुसार कार्यवाही करावी असा मी ठराव मांडत आहे.

राकेश शाह :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर.

प्रकरण क्र. ८३ :-

मा. आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेल्या निविदेचे अवलोकन करणेबाबत. (पे ॲन्ड पार्क विभाग)

ठराव क्र.  :-

प्रकरण क्र. ८४ :-

मा. आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेल्या निविदेचे अवलोकन करणेबाबत. (पे ॲन्ड पार्क विभाग)

ठराव क्र. ७९ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मौजे नवघर सर्व्हे क्र. ३८७/२,७ (जुना), १५८/२,७ (नविन) या जागेखाली आरक्षण क्र. २६४ (अे) पे ॲन्ड पार्क चालविण्याचे अथवा वापरण्याचे धोरण मा. महासभेत ठरविलेले नाही. म्हणून परस्पर निविदा काढून मान्य करणे बेकायदेशीर होईल.

तरी सदरचा विषय मा. महासभेत मंजुरी घेवून त्यानुसार कार्यवाही करावी असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. शरद पाटील        अनुमोदन :- श्री. राकेश शहा

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ८५, मा. स्थायी समिती सभेत प्रस्तावांचे अवलोकन करणेबाबत :- मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागातील संगणक संच व इतर साहित्य देखभाल व दुरुस्त करणे. प्रकरण क्र. ८६, सन २०१६-१७ या वित्तीय वर्षातील माहे एप्रिल २०१६ ते जुन २०१६ या त्रैमासिक जमाखर्चाचे अवलोकनाबाबत.

प्रकरण क्र. ८५ :-

मा. स्थायी समिती सभेत प्रस्तावांचे अवलोकन करणेबाबत - मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागातील संगणक संच व इतर साहित्य देखभाल व दुरुस्त करणे.

ठराव क्र. ८० :-

मिरा भाईंदर महागनरपालिकेतील विविध विभागातील संगणक संच देखभाल व दुरुस्तीकामी दि. २०/०४/२०१६ रोजी फेरनिविदा मागविण्यात आलेली आहे. या फेर निविदेस दि.२९/०४/२०१६ व दि.०६/०५/२०१६ रोजी अनुक्रमे प्रथम व द्वितीय मुदतवाढ देण्यात आलेली आहे. याकामी दोन निविदा प्राप्त झालेल्या आहेत निविदा धारकांनी खालील प्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| अ. क्र | तपशिल | मे. के.जे.एम. ग्रुपसिस्टम सोल्युशन प्रा.लि. यांचे वार्षिक दर रू | मे. एस.वे. कॉम्प्युटर्स प्रा.लि. यांचे वार्षिक दर रू | मे. एस.वे. कॉम्प्युटर्स प्रा.लि. वाटाघाटीनंतरचे यांचे वार्षिक दर रू |
|---|---|---|---|---|
| 1. | Comprehensive AMC of IBM Servers | Rs.22,500/- Rate per unit | Rs.24,000/- Rate per unit | Rs. 22,400/- Rate per unit |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2. | Comprehensive AMC of Wipro Servers | Rs.22,500/- Rate per unit | Rs.19,900/- Rate per unit | Rs. 19,900/- Rate per unit |
| 3. | Comprehensive AMC of Desktop Machines (Core 2 Duo, Dual Core, Core i3) | Rs.1,800/- Rate per unit | Rs.1,149/- Rate per unit | Rs. 1,149/- Rate per unit |
| 4. | Quick Heal antivirus Pro licences copy for one year validity per desktop | Rs.450/- Rate per unit | Rs.599/- Rate per unit | Rs. 440/- Rate per unit |
| 5. | Quick Heal antivirus Licence copy for windows 2003 server for one year validity | Rs.2,250/- Rate per unit | Rs.1,499/- Rate per unit | Rs. 1,499/- Rate per unit |
| 6. | Resident Engineer (At Head Office) | Rs.1,80,000/-Rate per unit | Rs.1,74,999/-Rate per unit | Rs. 1,74,999/- Rate per unit |
| 7. | Engineers for Ward and Regional Offices - | Rs.1,80,000/-Rate per unit | Rs.1,19,999/-Rate per unit | Rs.1,19,999/- Rate per unit |
| 8. | Comprehensive AMC of Lan work of MBMC Head office, Ward office 1,2,3,4,5,6 Divisional office kankiya, kashi, Ghodbundar, Chena, Murdha, Uttan, Dongari, Indira Gandhi Hospital including 12 Switches (24 Port) and 10 switches (8 port) | Rs.90,000/- Rate per unit | Rs.39,999/- Rate per unit | Rs. 39,999/- Rate per unit |
| 9. | Installation New LAN point with material (including IO, Raj45, Cat6 cable, casing patti, Electrical charges and Etc for commencing LAN point length up to 25 meter) | Rs.2,250/- Rate per unit | Rs.799/- Rate per unit | Rs. 799/- Rate per unit |
| 10. | Patch code (1 Meter) | Rs.180/- Rate per unit | Rs.49/- Rate per unit | Rs. 49/- Rate per unit |
| 11. | Cisco 24 Port Switch 2960 – 24-TCS or higher configuration (Comprehensive Warranty for 1 year) | Rs.27,000/- Rate per unit | Rs.19,999/- Rate per unit | Rs. 19,999/- Rate per unit |
| 12. | 24 Port Rack Mount Switch (L1) (Cisco / Gigabit / D-Link) | Rs.27,000/- Rate per unit | Rs.7,999/- Rate per unit | Rs. 2,400/- Rate per unit |
| 13. | Patch Code (2 Meter) | Rs.360/Rate per unit | Rs.69/- Rate per unit | Rs.69/- Rate per unit |

वरील तुलनात्कम तक्ता पाहता मे. एस. व्हे. कॅाम्प्युटर्स यांच्या वाटाघाटीनंतरच्या दरास मा. निविदा समितीची मंजुरी प्राप्त झालेली आहे. याकामी अंदाजे रु. ७,००,०००/- पर्यंत वार्षिक खर्च अपेक्षित आहे. सदर विषयाचे या सभेत अवलोकन करण्यात येत आहे.

सही /-
सभापती
मा. स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रकरण क्र. ८६ :-

सन २०१६-१७ या वित्तीय वर्षातील माहे एप्रिल २०१६ ते जुन २०१६ या त्रैमासिक जमाखर्चाचे अवलोकनाबाबत.

ठराव क्र. ८१ :-

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल २०१६ ते जून २०१६ अखेरचा जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करून मा. स्थायी समितीसमोर अवलोकनासाठी सादर करण्यात आलेला आहे.

त्याप्रमाणे अंदाजपत्रकीय जमा/खर्च व प्रत्यक्ष जमा/खर्चाचे तसेच आग सुरक्षा निधी जमा/खर्चाचे देखील अवलोकन करण्यांत आले आहे.

सही /-
सभापती
मा. स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

शरद पाटील :-

८४ नंबरचा जो ठराव मांडला त्याच्यावर अशी माहिती आहे की पे ॲन्ड पार्कचा निर्णय झाला आहे ती मोकळी जागा आहे. त्याच्यामध्ये झालेला आहे. ही जी आपली इमारत बांधली आहे आणि इमारत बांधली आहे ह्याच्यात मोकळ्या जागेत जे भाडे मिळते ती इमारत बांधली आहे. त्याच्यात महिन्याचे दीड लाख भाडे आहे आणि एवढी मोठी इमारत त्याला देण्यापेक्षा आपले जे महानगरपालिकेचे भंगार आहे ते ठेवण्यासाठी दिले तरी दीड लाख वसूल होतील. त्याच्यात लाईटचे बिल महानगरपालिकेनेच भरायचे आहे. त्यामुळे दीड लाखात देणे हे महानगरपालिकेला परवडण्याइतके नाही. त्याचे जे मेन्टेनन्स आहे कारण गाडी गेल्यावर तोडफोड होणार आहे आणि एक वर्षानंतर जो मन्टेनन्स येईल तो मेन्टेनन्स कोण करेल. तो मेन्टेनन्स भाड्यापेक्षा जास्त होईल. त्याच्यामुळे असा ठराव मांडला आहे की महानगरपालिकेने तसे धोरण ठरवावे नंतर पुढे करण्यात यावा असा आपण ठराव मांडला.

मा. सभापती :-

परिवहनचा विषय घ्या.

मा. उपायुक्त (मु.) :-

गेल्या वर्षभरापासून गाड्या चालू आहेत. एक गाडी २००-२२५ कि.मी. पर्यंत पर डे चालते. सी.एम. साहेबांचे उद्‌घाटन झाल्यापासून गाड्या चालू झाल्या तेव्हा ७-८ गाड्या चालू झाल्या होत्या त्या ७ गाड्यांना कोटेशनवर दोन लाखावर जे टायर आले ते त्यांना बसवले परंतु नंतरचा जो लॉट आला त्याची संख्या जास्त होती. आपल्याकडे एक्सपर्ट लोक नाहीत त्यासाठी मॅकेनिकल इंजिनियर पाहिजे, मॅकेनिकल पाहिजे, फुल प्लेज गोष्टी आपल्याकडे पाहिजेत. त्यातले काही नाही. आपल्याकडे जे आहे त्यामधून आपण मेन्टेनन्स करुन घेतो. सगळ्या गाड्या टायरसाठी नाही राहिल्या काही गाड्या ब्रेक डाऊन होतात. एकच गाडी महिनाभर थांबली आहे असा विषय नाही. काही गाड्या तिकडे जातात. काही इकडे येतात ॲव्हरेज गाड्या अंडर रिपेयरमध्ये राहतात त्याची संख्या ५-६ असेल पण एकच गाडी कायम नाही. गाड्या जातात येतात तुम्हाला डिटेल माहिती पाहिजे ती मी तुम्हाला देतो.

शरद पाटील :-

उपायुक्त साहेब आपण माहिती दिली ती आम्हाला मान्य आहे. आम्ही त्याच्यासाठी नाही बोलत नाही. तुमची जबाबदारी होती गोषवारा कधी द्यायला पाहिजे होता. मा. सभापती साहेब आणि सचिव साहेब आपल्याला आठवत असेल मा. महासभेमध्ये आयुक्त साहेबांनी सांगितलेला तसा गोषवारा नसेल तर इथे विषय घेणार नाही. गोषवारा नाही म्हणून विषय घेत नाही. गोषवारा कधी दिला मिटींग ११.०० ची होती.

मा. उपायुक्त (मु.) :-

गोषवारा सुरुवातीपासून दिला आहे. स्थायी समिती २८/१० चा गोषवारा आहे. आता ठराव दिला आणि हा पुर्नःविनियोजनाचा ठराव आहे. आता दिलेला तो ठराव दिला आहे. गोषवारा आधी दिलेला आहे.

शरद पाटील :-

पुढच्या मिटींगला विषय घेण्यात यावा.

मा. उपायुक्त (मु.) :-

गोषवारा २८/१० ला दिलेला आहे.

शरद पाटील :-

आम्हाला ही पण माहिती नाही की ड्रायव्हरला पगार किती लागतो. त्याला किती पगार दिला.

मा. उपायुक्त (मु.) :-

ती माहिती देतो.

शरद पाटील :-

मॅडम बोलल्या मी नंतर देतो असे चालते का?

प्रेमनाथ पाटील :-

एक गाडी तुम्ही बोलता पर डे २०० ते २२५ कि.मी. चालते.

मा. उपायुक्त (मु.) :-

बरोबर आहे.

प्रेमनाथ पाटील :-

टोटल आपल्या बसेस किती होत्या.

मा. उपायुक्त (मु.) :-

आपल्या वेळोवेळी बसेस वाढल्या आहेत. नोव्हेंबरला बस सेवा चालू झाली तेव्हा फक्त ८ बस होत्या. त्याच्यानंतर डिसेंबरमध्ये ५-६ बस आल्या, जानेवारीमध्ये ५-१० बस आल्या, २०१५ ला बस आल्या.

प्रेमनाथ पाटील :-

कोणत्या महिन्यात आल्या.

मा. उपायुक्त (मु.) :-

नोव्हेंबर महिन्यात आल्या.

प्रेमनाथ पाटील :-

एक बस किती कि.मी. चालली त्याची आम्हाला माहिती पाहिजे.

मा. उपायुक्त (मु.) :-

बस किती चालली ते नंबरव्हाईज मी तुम्हाला डिटेल देतो. ह्या बस जेव्हा आल्या मघाशी सन्मा. सदस्यांनी विचारले की बसची स्टेपनी वैगेरे. नविन ज्या बस होत्या त्या गोडाऊनमध्ये सुध्दा बरेच दिवस डिलीव्हरी घेतली नाही. सी.एम. साहेबांचे उद्घाटन आहे. म्हणून घेतली होती परंतु त्या कित्येक दिवस बस गोडाऊनमध्ये थांबल्या होत्या.

प्रेमनाथ पाटील :-

जोपर्यंत गाडी चालत नाही तोपर्यंत टायरची दशा होणार कशी.

मा. उपायुक्त (मु.) :-

नविन टायर असलेली गाडी तुम्ही दोन वर्ष उभी करा टायर चालणार का? नविन गाडीच्या टायरमध्ये हवा भरुन ठेवली आणि गाडी चालवलीच नाही तर त्याच्यातला टायर चालणार का?

प्रेमनाथ पाटील :-

तुम्ही बस गोडाऊनमध्ये ठेवल्या.

मा. उपायुक्त (मु.) :-

आपण बस गोडाऊनमध्ये ठेवली नाही. आपण बस सेवा चालू केली नाही म्हणून त्या गोडाऊनमध्ये राहिल्या. आपण त्याची डिलीव्हरी घेतली नाही.

शर्मिला बगाजी :-

ह्या चर्चेमध्ये एक खेदाची गोष्ट आहे की आपण जी.सी.सी. तत्वावर बस दिली नाही. आपल्या अंडर का घेतली कारण जी.सी.सी. तत्वावर चालू बसेस व्यवस्थित चालत नव्हत्या म्हणून परंतु आज पालिकेकडे असताना देखील परत तीच परिस्थिती आहे.

मा. उपायुक्त (मु.) :-

आपण जी.सी.सी. वर चालवली नव्हती. त्या वेळेस तो आपल्याला पर कि.मी. चार्ज देत होता ते ग्रॉस कॉन्ट्रॅक्टवर होते. ते एन.सी.सी. वर होते. म्हणजे ड्रायव्हर त्याचा डीझेल त्याचे कलेक्शन पण तोच करणार नंतर तो आपल्याला पर कि.मी. पैसे देत होता. क्रिस्टल एजन्सी होती. तो त्या बेसीसवर होता. आता काय आहे ड्रायव्हर त्याचा आहे, डीझेल त्याचे मेन्टेनन्स त्याचे आहे आणि कलेक्शनसाठी कंडक्टर आपण ठेवणार त्यामुळे त्याला जो खर्च झाला असणार त्याप्रमाणे आपल्याकडे पर कि.मी. तो क्लेम करणार आहे. ह्यासाठी निविदा काढली आहे. आपण त्याला नंतर महासभेमध्ये ठरवणार आहोत की त्याला किती पर कि.मी. द्यायचे. कलेक्शन आपण करणार. एखाद वेळी अस होईल खर्च जास्त होईल कलेक्शन कमी होईल. एखाद वेळेस कलेक्शन जास्त होईल खर्च कमी होईल. नेट अर्निंग पर कि.मी. ते कॉस्ट पर कि.मी. हा आपल्याला ठरवायला लागेल किती येतो. आपल्याकडे इ.पी.की.म. आहे तो आपल्याला माहित आहे. मागच्या चार दिवसांपूर्वी ऑपरेटरची बैठक झाली. त्याचे म्हणणे आहे वर्षभरात तुमच्या गाड्या चालल्या त्याची घसारा किंमत कमी करावी. आपण त्याच्याकडून कॉन्ट्रिब्यूशन घेतो.

शर्मिला बगाजी :-

सर तुम्ही जे बोलता ते आम्हाला मान्य आहे. त्याच्याबद्दल आमचा वाद नाही. जे आपण एजन्सीला देऊन जे हाल चालले आहेत ते पुन्हा तेच होते. त्याच्यामध्ये काय फरक झाला.

मा. उपायुक्त (मु.) :-

आपल्याकडे हे चालवण्यासाठी इंजिनियर पाहिजेत. मॅकेनिकल इंजिनियर पाहिजेत, मॅकेनिक पाहिजेत फुल फ्लेज गॅरेज आपल्याकडे पाहिजे. वॉशिंग इक्वीपमेन्ट्स पाहिजेत इन्फॉर्मेशन सिस्टम पाहिजे. ते सध्या आपल्याकडे नाही. हे असायला पाहिजे म्हणून आपण जी.सी.सी. वर निविदा मागवलेली.

शर्मिला बगाजी :-

आपल्याकडे हे नाही. म्हणजे आपण त्याच्यासाठी सक्षम नाही हे सिध्द झाले आहे. जी.सी.सी.वर देण्यासाठी साधारण वर्षभर आपण मागे लागलो आहोत. जी.सी.सी. तत्वावर देण्याचे धोरण ठेऊन आपण वर्षभर चाललो आहोत. पण वर्षभरात आपले फायनल झाले नाही की कोणाला द्यायचे मग हे किती दिवस चालणार. कारण आपल्याकडे त्यांच्यावर कन्ट्रोलिंग ठेवणारे कुणीच नाही. आम्ही काय शंका विचारल्या तर निरसन कोण करणार. नागरिक लोकप्रतिनिधींना विचारतात. लोक प्रतिनिधीनी कोणाकडे जायचे. सक्षम अधिकारी कोण आहे की आमच्या शंकेचे निरसन करु शकेल.

मा. उपायुक्त (मु.) :-

ह्यापूर्वी क्रिस्टल नावाची एजन्सी होती त्यांचा एक्सपिरियन्स आपल्याकडे होता. तो एन.सी.सी. वर होता. आपण जी.सी.सी. कडे केव्हा गेलो जेव्हा आपल्याला वर्ल्ड बँकेने सुचवले. आम्ही तुम्हाला एवढा मोठा निधी देतो जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत बस घेण्यासाठी तर त्यांनी डायरेक्शन दिले की तुम्ही जी.सी.सी. वर बस चालवल्या तर अखंडित सेवा देऊ शकाल. अदरव्हाइज तुम्ही कोणत्या तरी ऑपरेटरला दिले आणि त्यांनी मेन्टेनन्स केले नाही तर तुमच्या गाड्या बंद राहतील तुम्ही लोकांना सोयी सुविधा देऊ शकणार नाही. वर्ल्ड बँकेच्या मिटींगमध्ये त्या बाबी आल्या आहेत. तुम्ही जी.सी.सी. वर आणा. महासभेने ह्याच्यात धोरण ठरवताना

बराच वेळ घेतला. महासभेने जी.सी.सी. चा विषय फेटाळला होता. नंतर तो विषय पुन्हा ठेवला त्याच्यानंतर आपण मान्यता दिलेली आहे. त्यामुळे वर्षभर चाललेली निविदा आधी निविदा काढली त्यावेळेस बोलले की ह्याला महासभेची मान्यता नाही. म्हणून आपण विशेष सभेत विषय ठेवला. त्याच्यानंतर आपण मान्यता दिलेली आहे. त्यामुळे वर्षभर आधी निविदा काढली त्यावेळेस बोलले की ह्याला मान्यता नाही. आपण पुन्हा विषय सभेत ठेवला. त्यानंतर महासभेने तो विषय फेटाळला. वर्ल्ड बँकेने म्हटले की तुम्हाला जी.सी.सी. वरच द्यायला पाहिजे. त्यामुळे पुन्हा विषय ठेवला नंतर आपण मान्यता दिली ह्या सगळ्यामध्ये वेळ गेलेला आहे. तोपर्यंत आपण बस सेवा बंद ठेवली असती तर आपण फक्त उद्घाटन केले आणि बस दिलेली नाही म्हणून ही बस सेवा चालू ठेवली.

वेंचर मेन्डोंसा :-

सर आपल्याकडे नविन बसेस किती आल्या आहेत.

मा. उपायुक्त (मु.) :-

आता ज्या आल्या आहेत त्या नविनच आहेत.

वेंचर मेन्डोंसा :-

कंपनीनी किती वॉरन्टी आणि गॅरेन्टी दिली.

मा. उपायुक्त (मु.) :-

जे पार्टस येतात ते वॉरेन्टीमध्येच येतात.

वेंचर मेन्डोंसा :-

किती वर्षाची किंवा किती कि.मी.

मा. उपायुक्त (मु.) :-

कि.मी. चे त्यांचे जे स्टॅन्डर्ड आहे त्याप्रमाणे गॅरेन्टी आणि वॉरन्टीमध्ये फरक आहे.

वेंचर मेन्डोंसा :-

साहेब तुम्ही क्लियर करायचे ना. ते लोक दोन मॅकेनिक पण देतात. जेवढ्या वस्तू घेऊ ना ती लोक घरपोच आपल्याला मॅकेनिक पण देतील. एक वर्षासाठी किंवा दोन वर्षासाठी. जशी आपण कंपनीबरोबर बोलणी करु तसे.

मा. उपायुक्त (मु.) :-

आपण मागच्या वेळेस स्टॅन्डिंग कमिटीला हा विषय आला होता. आपण त्यांना बोलावले ते लोक येऊन काम करायला तयार नाहीत. त्याचे म्हणणे तुम्ही ह्याच्यामध्ये पाठवा हा विषय मध्यंतरी झालेला आहे. मेन्टेनन्सचा विषय स्टॅन्डिंगमध्ये येऊन गेलेला आहे.

वेंचर मेन्डोंसा :-

मॅडम बोलल्या की त्याचा मेन्टेनन्स करावा लागतो.

मा. उपायुक्त (मु.) :-

मेन्टेनन्स करायचा म्हणजे आता काय झाले आहे. म्हणजे आता जे स्टॅन्डर्ड पार्ट आहे. वॉरन्टी गॅरेन्टी त्याच्या व्यतिरिक्त ज्या गोष्टी झाल्या त्या कराव्या लागतात त्यासाठी आपण बस बंद ठेवू शकत नाही.

शर्मिला बगाजी :-

हो चर्चा करुन ह्याच्यातून काही साध्य होत नाही. आता ४७ बस आहेत अजून येणार आहेत. सध्या ह्या ४७ बस मेन्टेन करायला आपली कॅपेसिटी नाही. तर मग बाकीच्या बसेस येऊन पडतील तर मग तेच पुन्हा रडगाण चालू होईल.

मा. उपायुक्त (मु.) :-

मॅडम बस रेडी आहेत पण आपण डिलीव्हरी घेतली नाही. आपण डिलीव्हरी घेत नाही.

प्रेमनाथ पाटील :-

का घेत नाही?

शर्मिला बगाजी :-

का घेत नाही नागरिकांना तसेच झूरत ठेवायचे असे प्रशासनाने ठरवले आहे.

मा. उपायुक्त (मु.) :-

सुरुवातीला प्रशासनाने भुमिका घेतली असती की आपल्याकडे कुठल्या प्रिन्सिपलवर गाडी चालवायची आहे. हे निश्चित नाही. आपल्याकडे कुठले एक्सपर्ट नाहीत. आपण लोकांना सुविधा देणार आहोत.

शरद पाटील :-

ड्रायव्हरवर पगार किती गेला ते सांगा.

मा. उपायुक्त (मु.) :-

७४८ मिनिमम वेजेसप्रमाणे बघा. जेव्हा आपण महासभेमध्ये निर्णय घेतलेला होता की, मिनिमम वेजेस सर्वांना लागू करा. जानेवारी किंवा फेब्रुवारीपासून आपण त्यांना मिनिमम वेजेसप्रमाणे त्यांना देतो. गेले आठ महिन्यांपासून मिनिमम वेजेसप्रमाणे देतो त्याच्या आधी सी.एम. साहेब येणार म्हणून बस चालू करायची होती त्यासाठी दर मागवले होते ते दर कमी होते. परंतू महासभेने जेव्हा निर्णय घेतला की मिनिमम वेजेसप्रमाणे

आरोग्याचे जे कामगार आहेत त्याच्याप्रमाणे दिले जातात. स्किल, सेमी स्किल आणि अनस्किल रफली ७४८ रु. पर डे त्यांना मिनिमम वेजेसप्रमाणे पडते.

शर्मिला बगाजी :-

कॉन्ट्रॅक्टरला देतो.

मा. उपायुक्त (मु.) :-

आपण कॉन्ट्रॅक्टरला पेमेन्ट करतो.

शरद पाटील :-

ड्रायव्हरला पगार किती दिला.

असेन्ला मेन्डोंसा :-

तुम्ही बोलत आहात We have ordered 100 buses you contract your own statement why saying we do not have the expert nither Engineers nor a garage to take care of it. So are their any intelligent are educated people working on it or do you have अंगूठा छाप because how can you take such a beautiful plane decision without any instrument in your hands.

मा. उपायुक्त (मु.) :-

मॅडम हा निर्णय आम्ही घेतलेला नाही.

असेन्ला मेन्डोंसा :-

But you people are support to be experts who are telling the mahasabha की साहेब हे करु नका जिथपर्यंत तुम्ही सक्षम नाहीत आहेत तिथपर्यंत कारण आज तुम्ही बोलत आहात We have paying minimum wages त्या ड्रायव्हरची काय चूकी आहे की तुमच्या बस बंद आहेत तो कशाला मिनिमम वेजवर काम करेल if you as to get whatever on top of it. It is his right his children with supper because of your wrong decision secondly people are travelling on the road we have got a cars I don't care dam with busses or strike or buses not working personally. I don't care but being a public representative it is my duty and they are right that I question why is it not their and end of the day we at this place are sitting to get them service we don't need the service Just I have one recommendation तुम्ही जे काही करणार please seat would you have back up who will work on it or don't do it आता पण तुम्ही काय बोलतात की आपण बसेसच्या डिलीव्हरी घेत नाहीत त्यांना काहीतरी प्रिपेमेन्ट केले असणार की नाही. I am asking cleryfication for a reason. If you have a mistake in the past not necessary because that buses are made you should continue you can always bring objection that is my suggestion Now the thing is where was are you stopped to me.

शरद पाटील :-

मा. उपायुक्त साहेब इथे कोणी सदस्य विरोधात नाही. ही लोक सेवा आहे आणि ही लोकसेवा सर्वांना द्यायची आहे असे त्यांचे म्हणणे आहे. पण जी माहिती आम्हाला पाहिजे ती पाहिजे ना.

असेन्ला मेन्डोंसा :-

साहेब आपण डाऊन पेमेन्ट दिले आहे की नाही मला सांगा.

मा. उपायुक्त (मु.) :-

ज्या वेळेस आपल्याला १०० बस घ्यायची जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत केंद्र सरकारची मंजूरी मिळाली. त्यामध्ये आपण असे डिसाइड केले की मिनी बस किती घ्यायच्या स्टॅन्डर्ड बस किती आणि एसी बस किती घ्यायच्या.

असेन्ला मेन्डोंसा :-

But your answer is something different.

(सभागृहात गोंधळ)

मा. उपायुक्त (मु.) :-

नाही डिफरन्ट नाही. आपण १०० बसची सॅक्शन घेतलेली होती. आपल्याला तिथून १०० बसचे अनुदान मिळाले होते. म्हणून आपण घेणार होतो. अनुदानमध्ये ८० टक्के केंद्र सरकार देणार होते २० टक्के राज्यसरकार देणार होते.

असेन्ला मेन्डोंसा :-

Sir I don't care कोण काय देत You answer my question have you paid a down payment then or no.

कल्पिता पिंपळे :-

तरतूद अशी होती मोबिलायझेशन ॲडव्हान्स द्यायचे होते. मोबिलायझेशन ॲडव्हान्स ॲज पर ॲग्रीमेन्ट आपण दिले त्याच्यानंतर बसेस झाल्या डिलीव्हरी घ्यायची आहे तेव्हा आपण त्यांना पेमेन्ट केले.

असेन्ला मेन्डोंसा :-

No payment at all.

कल्पिता पिंपळे :-

नाही.

असेन्ला मेन्डोंसा :-

What is mobilization means.

कल्पिता पिंपळे :-

१० टक्के मोबिलायझेशन म्हणजे त्यांना मोबिलाइज करण्यासाठी.

असेन्ला मेन्डोंसा :-

Start their work. मॅडम १० टक्के पालिकेचेच गेले ना.

कल्पिता पिंपळे :-

हो ना.

असेन्ला मेन्डोंसा :-

मॅडम ऐका माझ्या वॉर्डच्या नगरसेवक निधीचे काम करायला पैसे नाहीत. All are trying to say used the write intelligent planning because जे गरजेची काम आहेत ती होत नाहीत. आणि ४-४ वर्षे आपले १० टक्के असेच घूसत राहीले सर्व फिल्डमध्ये तर आपल्या लोकांचेच टॅक्स जातात.

कल्पिता पिंपळे :-

मॅडम त्याच्याशिवाय त्यांनी आपल्या बसेसचे करायला सुरुवात केली नसती.

असेन्ला मेन्डोंसा :-

Exactly I trying to say if you gone use a bus 2020 and you know their going to take 12 months to make it you book it 19 not in 16 only when your capable.

शरद पाटील :-

आपण बसून ड्रायव्हरला पगार किती दिला ते सांगा.

कल्पिता पिंपळे :-

बसून ड्रायव्हरला पगार दिला असे नाहीच आहे.

शरद पाटील :-

आपल्या बसेस बंद आहेत तर ड्रायव्हर कुठे ड्यूटी करतात. आणि किती शिफ्टमध्ये ड्यूटी करतात.

कल्पिता पिंपळे :-

आपल्या ज्या उत्तनच्या बसेस आहेत त्या आपल्या तीन शिफ्टमध्ये चालतात. बाकीच्या दोन शिफ्टमध्ये चालतात. हा जो टायर्सचा इश्यू आहे प्रत्येक बस ६०,००० कि.मी. चालली की त्यांचे प्रॉब्लेम चालू होतात. हिच बस आपली २०० कि.मी. चालते. त्याच्यानंतर पहिल्यांदा आपण २० ऑगस्टला टायर्स खरेदी केले. त्याच्यानंतर आपण ऑक्टोबर महिन्यात दरपत्रक मागवली. ते दरपत्रक दोन लाखापर्यंतच खर्च करु शकतो. तेव्हा आपण ते टायर्स खरेदी केले. ज्या-ज्या टायमाला कळत होते त्या-त्या टायमाला टायर्स अव्हेलेबल करुन दिले आहेत. आता जो इश्यू झाला त्याचा रिपोर्ट आम्हाला १५ नोव्हेंबरला मिळाला की एवढ्या एवढ्या बसेसचा प्रॉब्लेम होतो. मग आम्ही १९ ला त्यांना लेटर देऊन २० ड्रायव्हर आणि २० कंडक्टर आपण कमी केले. आता आपण ७ दिवसांचे काढले आहे. ५ डिसेंबरला त्या निविदा मिळतील.

वेंचर मेन्डोंसा :-

मॅडम एक बस दिवसाला किती कि.मी. चालते.

कल्पिता पिंपळे :-

२०० कि.मी. म्हणजे सर कसे आहे मिडी बस असेल तर १६० ते १६५ आणि टाटाच्या स्टॅन्डर्ड बसेस आहेत त्या २००.

वेंचर मेन्डोंसा :-

मॅडम मला सांगा एक बस किती ट्रीप मारते.

कल्पिता पिंपळे :-

आपल्या शेड्यूल्डनुसार आपल्या ट्रीप्स आहेत ना. आपण ६ बसेस ठेवल्या आहेत त्याचे कि.मी. काढले आहेत.

वेंचर मेन्डोंसा :-

मॅडम भाईंदर स्टेशन ते चौक १५ कि.मी. सिंगल. तर रिटर्न आल्यावर ३० कि.मी. झाले. मग एक बस किती ट्रीप मारते. साधारण ५ ट्रीप पण एक बस मारत नाही.

कल्पिता पिंपळे :-

नाही सर आपल्या उत्तनच्या बसेस आहेत.

वेंचर मेन्डोंसा :-

मॅडम मी चौकचे पकडतो ना एक्स्ट्रा पकडतो.

कल्पिता पिंपळे :-

सर आहेत ना.

वेंचर मेन्डोंसा :-

मी एक्स्ट्रा ७ कि.मी. पकडतो.

कल्पिता पिंपळे :-

सर आपण उत्तन आणि चौकला बाकीच्या बसेस कमी केल्या आणि तिथे प्रोव्हाईड केल्या.

वेंचर मेन्डोंसा :-

मॅडम आणखी एक गोष्ट संध्याकाळी स्टेशनवरुन बससाठी खूप गर्दी होते. लोकांची कम्पलेन्ट आहे. वर्किंग क्लास आहेत त्यांना बसायला पण होत नाही. लेडीजना त्रास होतो. कारण बस पॅक असते त्यांना उतरायला भेटत नाही. त्यामुळे संध्याकाळी ७ ते ९ च्या दरम्यान लेडीज बस ठेवल्या तर...........

कल्पिता पिंपळे :-

ओन्ली लेडीज स्पेशल ठीक आहे.

वेंचर मेन्डोंसा :-

मॅडम संध्याकाळच्या वेळेला दोन बस वाढवा. सकाळी पण मॅडम सकाळी पण उत्तनवरुन दोन बस लेडीजसाठी एक्स्ट्रा ठेवा. आणि संध्याकाळी स्टेशनवरुन दोन बस ठेवा.

मर्लिन डिसा :-

लेडीज बसेस उत्तन टू मिरारोड उत्तन टू काशिमिरा या साईडची लोक तिकडे पण कामाला येतात खूप त्रास होतो. ब्रेक जर्नी होते म्हणून गोराई, उत्तन, चौक एक्स्टेन्शन ॲटलिस्ट एनी फॉर हावर्स एक बस असली तरी चालेल.

कल्पिता पिंपळे :-

मॅडम कस आहे की आपल्याला या एरियाला किती बस लागणार त्याचे आपण स्टडी केलेले आहे. त्याच्यामध्ये २१५ बसेसची डिमांड आहे. आपल्याकडे १०० बस आहेत त्यामुळे सर्वांचे डिमांड पूर्ण करणे शक्य होणार नाही. दुसऱ्या बसेस घ्याव्या लागतील.

वेंचर मेन्डोंसा :-

मॅडम त्यांना खूप प्रॉब्लेम होतो.

दक्षता ठाकूर :-

मॅडम लेडीज बसेस तुम्ही चालू करणार त्यासाठी तुमच्याकडे बसेस असतील ना.

कल्पिता पिंपळे :-

मी तेच म्हणते.

(सभागृहात गोंधळ)

कल्पिता पिंपळे :-

हा धोरणात्मक निर्णय आहे.

दक्षता ठाकूर :-

मॅडम माझे ऐकून घ्या तुम्ही बोलतात लेडीज बस सुरु करणार.

कल्पिता पिंपळे :-

हा धोरणात्मक निर्णय आहे.

दक्षता ठाकूर :-

मॅडम तुम्ही बोलल्या लेडीज बस सुरु करणार.

कल्पिता पिंपळे :-

मी बोलते म्हणजे प्रस्ताव ठेऊ.

दक्षता ठाकूर :-

सध्या तुमच्याकडे बसेस आहेत ना लेडीज बसेस सुरु करण्यासाठी बसेस आहेत की नाही.

कल्पिता पिंपळे :-

आपल्याकडे बसेस रेडी आहेत पण जी.सी.सी. वरचा ऑपरेटर फिक्स झालेला नाही. जोपर्यंत तो फिक्स होत नाही तोपर्यंत आपण डिलीव्हरी घेऊ शकत नाही. आता प्रिबीड वैगेरे झालेले आहे. अजून २१ दिवसाचा कालावधी देणार आहोत तो ऑपरेटर आपल्याला मिळेल.

दक्षता ठाकूर :-

आज ६ महिने झाले मी तुम्हाला सांगते माझी स्लम एरिया आहे. माझ्या वॉर्डमध्ये बसेस सुरु करा. मी एक बससाठी मागणी केली आहे तुम्ही मला फक्त तारखा देता की आज करेन उद्या करेन १ महिन्यांनी करेन त्या दिवशी बोलल्या की वॉर्डातल्या लोकांना १५ दिवसाचा वेळ द्या. मग अजून मी किती वेळ देऊ ते सांगा. तुम्ही सांगता बसेस अव्हेलेबल आहेत आणि मी फोन केल्यावर सांगता की बसेस नाहीत. अव्हेलेबल नाहीत मग काय करणार.

कल्पिता पिंपळे :-

म्हणून मी म्हटले वॉर्डातल्या लोकांना एक महिना सांगा. १० बसेस आपण घेणार आहोत.

दक्षता ठाकूर :-

मॅडम पहिल्या वेळेला सांगितले की मी १५ ऑगस्टला बस सुरु करणार. मग तुम्ही का नाही केल्या. मॅडम ह्या गोष्टीला ६ महिने झाले.

कल्पिता पिंपळे :-

नविन रुट आहे त्यामुळे प्रॉब्लेम आहे.

दक्षता ठाकूर :-

नविन नाही. तिकडे बस सुरु होत्या.

मर्लिन डिसा :-

मॅडम ती सेम बस मिरारोड स्टेशनवरुन पास करा.

दक्षता ठाकूर :-

मॅडम कॉलेज आणि स्कूलला जाणाऱ्या मूलांचे खूप हाल होतात. स्लम एरिया आहे. त्यामुळे लोक डोंगर चढून हायवेवर जातात.

शरद पाटील :-

मा. सभापती महोदय आम्ही ठराव मंजूर करुन देतो. कारण लोकांसाठी आहे त्यामुळे अडवून चालणार नाही. महापालिकेचे नुकसान होईल असे काम करु नका. तुम्ही याच्यावर लक्ष द्या. ही सेवा आपण लोकांना देतो. मिरा भाईंदरचे नाव अख्ख्या राज्यामध्ये पहिले आले पाहिजे.

मर्लिन डिसा :-

ड्रायव्हर्स घरी बसवले. त्यांची तर काय चुकच नाही.

शरद पाटील :-

वरिल विषयानुसार परिवहन विभागाकडील खालीलप्रमाणे तरतूदीचे पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र लेखा संहिता १९७१ नमूना क्र.१० नियम ३० (३) पहा

| | या शिर्षातून (From) | | | | | ह्या शिर्षात (To) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | प्रदान गौण व तपशिलावर शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वैगरे | मुळ अनुदान रुपये | आजतारख ो पर्यंतचा खर्च रु. | उपलब्ध शिल्लक | प्रदान गौण व तपशिलावर शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वैगरे | मुळ अनुदान रुपये | आजतारखे पर्यंतचा खर्च | प्रस्तावीत वाढीची रक्कम | अभिप्राय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | जी.सी.सी. तत्वावर बस चालविणेसाठी येणारा खर्च | - | १८,००,००,०००/- | - | १८,००,००,०००/- | इंधन,वंगण स्पेअर पार्ट खर्च | - | १,००,००,०००/- | ९६,९०,६८८/- | १,६५,००,०००/- | मा. महासभा दि.०७/०५/२०१६ ठराव क्र.२१ नुसार जी.सी.सी. तत्वावर बसेस चालविणे ठेका निश्चिती साधारणतः ०३ महिन्यात होईल त्यानुसार इंधनाकरिता प्रतिमाह ५० लाख व दुरुस्ती करिता साधारणतः प्रतिमाह ५ लाख असे मिळून १,६५,००,०००/- आवश्यक आहेत. |
| २ | - | - | - | - | - | तिकिट भाडे संकलित करणेसाठी येणारा खर्च | - | ३,००,००,०००/- | २,८७,९६,७०९/- | ५,४०,००,०००/- | मा. महासभा दि.०७/०५/२०१६ ठराव क्र.२१ नुसार जी.सी.सी. तत्वावर बसेस चालविणे ठेका निश्चिती केल्याने कर्मचारी वर्ग नेमणूक व वेतन अदा महानगरपालिका परिवहन विभागाकडून करावे लागणार आहे. प्रतिमाह वेतनावरिल खर्च सद्यःस्थितीत रु.६० लाख होत आहे. त्यानुसार पूढील उर्वरीत ०९ महिने X ६० लाख = ५,४०,००,०००/- (अक्षरी पाच कोटी चाळीस लाख मात्र) आवश्यकता आहे. |
| | एकुण | | | | १८,००,००,०००/- | | | | | ७,०५,००,०००/ | |

वरील पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देण्यात येत आहे.

प्रभाकर म्हात्रे :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर.

प्रकरण क्र. ७८ :-

परिवहन विभागाच्या पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देणेबाबत.

ठराव क्र. ७६ :-

वरिल विषयानुसार परिवहन विभागाकडील खालीलप्रमाणे तरतूदीचे पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र लेखा संहिता १९७१ नमूना क्र.१० नियम ३० (३) पहा

| | या शिर्षातून (From) | | | | | ह्या शिर्षात (To) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | प्रदान गौण व तपशिला वर शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वैगरे | मुळ अनुदान रुपये | आजतारखे पर्यंतचा खर्च रु. | उपलब्ध शिल्लक | प्रदान गौण व तपशिलावर शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वैगरे | मुळ अनुदान रुपये | आजतारखे पर्यंतचा खर्च | प्रस्तावीत वाढीची रक्कम | अभिप्राय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | जी.सी.सी. तत्वावर बस चालविणे साठी येणारा खर्च | - | १८,००,००,०००/ - | - | १८,००,००,०००/ - | इंधन,वंगण स्पेअर पार्ट खर्च | - | १,००,००,०००/- | ९६,९०,६८८/- | १,६५,००,०००/- | मा. महासभा दि.०७/०५/२०१६ ठराव क्र.२१ नुसार जी.सी.सी. तत्वावर बसेस चालविणे ठेका निश्चिती साधारणतः ०३ महिन्यात होईल त्यानुसार इंधनाकरिता प्रतिमाह ५० लाख व दुरुस्ती करिता साधारणतः प्रतिमाह ५ लाख असे मिळून |
| २ | - | - | - | - | - | तिकिट भाडे संकलित करणेसाठी येणारा खर्च | - | ३,००,००,०००/- | २,८७,९६,७०९/- | ५,४०,००,०००/- | मा. महासभा दि.०७/०५/२०१६ ठराव क्र.२१ नुसार जी.सी.सी. तत्वावर बसेस चालविणे ठेका निश्चिती केल्याने कर्मचारी वर्ग नेमणूक व वेतन अदा महानगरपालिका परिवहन विभागाकडून करावे लागणार आहे. प्रतिमाह वेतनावरिल खर्च सद्यःस्थितीत रु.६० लाख होत आहे. त्यानुसार पूढील उर्वरीत ०९ महिने X ६० लाख = ५,४०,००,०००/- (अक्षरी पाच कोटी चाळीस लाख मात्र) आवश्यकता आहे. |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकुण | | | | १८,००,००,०००/ | | | | | ७,०५,००,०००/- | |

वरील पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. शरद पाटील अनुमोदन :- श्री. प्रभाकर म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. सभापती :-

तहकुब सभा संपली असे मी जाहिर करतो.

(सभा संपल्याची वेळ :- दु. १२.४५ वा.)

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)

प्र. नगरसचिव

मिरा भाईंदर महानगरपालिका